# जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था नियमित नं. १, सोलापूर

स्थापना : ११/५/१९३४ नों.क्र. ७२३४ फोन : २७२४५०२

# १० वी अधिमंडळाची सर्वसाधारण सभा २०२४

## वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

**(फक्त सभासदांकरिता)**

जा. क्र. – ५९/२०२४ दि. ३१/०५/२०२४

सन्माननीय सभासद बंधु भगिनींनो,

आपल्या पतसंस्थेची सन २०२३–२०२४ ची वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार, दि. १५/०६/२०२४** रोजी दुपारी १.०० वा. **शांतीसागर मंगल कार्यालय,** १६२/१९, रेल्वे लाईन्स, सोलापूर येथे घेण्यात येणार आहे. सदर सभेस सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

### विषय सुची

**१)** मागील दिनांक ११/०६/२०२३ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे. **२)** दि. ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ अखेरचा अहवाल, ऑडिटेड तेरीज पत्रक, ताळेबंद पत्रक व नफा–तोटा पत्रक वाचून त्यास मंजूर देणे बाबत. **३)** सन २०२३ ते २०२४ साली झालेल्या नफ्याची वाटणी व्यवस्थापक कमिटीने शिफारस केल्याप्रमाणे वाटणी करण्यास मंजूरी देणे बाबत. **४)** सन २०२३–२०२४ सालाचे अंदाज पत्रकातील कमी जादा रक्कम खर्ची झाली ते पाहून त्यास मंजुरी देणेबाबत. **५)** सन २०२४–२०२५ सालाचे अंदाजपत्रकास मंजुरी देणेबाबत. **६)** लाभांश समानीकरण व इमारत निधी लाभांशसाठी वर्ग करणेबाबत. **७)** सन २०२२–२०२३ च्या लेखा परिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाची वाचून नोंद घेणे. **८)** सन २०२४–२०२५ साठी प्रमाणित लेखापरिक्षकाची नेमणूक करणेस मान्यता देणे. **९)** अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक करण्याबाबत **१०)** सभासद मृत्यु सहाय्यता निधीमधून रक्कम वर्ग करणेबाबत. **११)** थकित सभासदांचा व अदा न झालेला लाभांश सभासदांच्या कर्ज, व्याज खाते व शेअर्स खाते जमा करणे बाबत. **१२)** नोटिस दिलेल्या प्रकरणावर १०१ ची कायदेशीर कार्यवाही संस्थेच्या वकिलामार्फत करणेस मंजूरी देणे बाबत. **१३)** सभासदांसाठी सोलापूर व पंढरपूर येथे गृहनिर्माण योजना राबणिवेबाबत आलेल्या प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणे व स्वतंत्र कर्जपुरवठा धोरण ठरविणे. **१४)** पोटनियम दुरुस्ती करणेबाबत (पोटनियम क्र. ई १–१, पोटनियम क्र. क १–३) **१५)** श्री. डी.एल. देशपांडे सचिव यांना दोन वर्षे मुदतवाढ देणेबाबत. **१६)** संस्थेचे वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू न शकणाऱ्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे. **१७)** आयत्या वेळी येणाऱ्या विषयाचा मा. चेअरमन यांच्या परवानगीने विचार करणे.

**टीप : अ)** ज्या सभासदांना सुचना करावयाच्या असतील किंवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि. ११/०६/२०२४ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करावेत तसेच मा. चेअरमन यांच्या व्हॉटस्ॲप नं. 9890677966 व सचिव यांच्या 9422462668 व्हॉटस्ॲप नंबरवर अथवा संस्थेच्या zpsociety1@gmail.com या ईमेल वरही प्रश्न विचारता येतील व सूचना करता येतील.

**ब )** सभेस गणपूर्ती न झाल्यास ही सभा अर्धा तास तहकुब करण्यात येईल व सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी घेण्यात येईल. त्यावेळी गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

**क)** नोटीस व अहवाल पतसंस्थेचे www.soczpsno1.in या वेबसाईटवर प्रसिद्ध केले जाईल.

| | | |
|---|---|---|
| **दत्तात्रय देशपांडे** | **सुहास चेळेकर** | **विवेकानंद लिंगराज** |
| सचिव | व्हा. चेअरमन | चेअरमन |